**कृपया प्रसिद्धीसाठी** **20 ऑगस्ट 2013**

## ज्योतिर्भास्कर साळगावकर यांना श्रद्धांजली

### *महाराष्ट्राचा सांस्कृतिक चेहरा हरपला : राम नाईक*

**मुंबई, मंगळवार :** ‘‘ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर यांच्या निधनाने महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जपणारा, सांस्कृतिक चेहरा हरपला आहे. आजच्या काळात वेगळ्या अर्थाने साळगावकरांनी मराठी झेंडा अटकेपार नेला. त्यांच्या कालनिर्णय दिनदर्शिकेने कालातीत विश्वविक्रम निर्माण केला. केवळ मराठीतच नव्हे तर अनेक प्रादेशिक भाषांमध्ये व इंग्रजीतही या दिनदर्शिका जगभर घेतल्या जातात. सार्वजनिक गणेशोत्सवांचे मांगल्य जपण्याबाबत त्यांनी घेतलेला पुढाकार कायम स्मरणात राहील. कै. साळगावकर यांना माझी श्रद्धांजली’’, अशा शब्दात माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी आपला शोक व्यक्त केला.

**(कार्यालय सचिव)**